
# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संलग्नित

सर्वोदय शिक्षण संस्थेचे

## कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

**कोवाड ता. चंदगड, जि. कोल्हापूर**

राष्ट्रीय सेवा योजना आणि समाजशास्त्र विभाग आयोजित

## एक दिवशीय
## राष्ट्रीय ऑनलाईन वेबिनार

# Dr. Babasaheb Ambedkar's Human Rights, Socio-Economic and Political Thought


Convener

**Dr. Khanderaoji S. Kale**

Co-convener

**Dr. Vithal K. Dalvi**

Principal

**Dr. Vishnu R. Patil**

41) डा.बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार
डॉ. के. पी. वाघमारे, जि— कोल्हापूर ||179

42) DR. B R Ambedkar - Bulwark of women emancipation in India
Mr. Akash Tawar, Bilaspur, Chhattisgarh, India ||182

43) स्त्रीमुक्ती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर
डॉ. कोळसेकर मनोहर सुबराव, नेसरी ||187

44) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारांबद्दलचे कार्य
कांबळे प्रशांत प्रकाश, गडहिंग्लज ||190

45) बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार
कु. प्रतिभा पुंडलिक दुंडगे, गडहिंग्लज ||193

46) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व जलसंस्कृती जोपासना
डॉ. जगदीश दिनकर शेवते, नसरापूर ||195

47) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविध क्षेत्रातील चळवळी
प्रा. पराग मुरलीधर सपाटे, जि. नागपूर ||198

48) महार रेजिमेंटच्या स्थापनेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान : एक ...
डॉ. जान्हवी सुबोध थोरात, मुंबई ||202

49) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार
नम्रता पंडीतराव म्हस्के, औरंगाबाद ||207

50) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार
कु. योगिता पांडुरंग डावरे, गडहिंग्लज ||209

51) महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाची तुलना
सहा. प्रा. डी. एस. क्षीरसागर, जि. कोल्हापूर ||213

52) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन
डॉ. डी. जी. चिघळीकर, गडहिंग्लज ||217

53) धार्मिक चेतना के पक्षधर डॉ— आंबेडकर: 'अपने—अपने पिंजरे' के संदर्भ में
प्रा.डॉ अजयकुमार कृष्णा कांबळे, जि.कोल्हापुर, महाराष्ट्र ||223

54) Dr. B.R. Ambedkar's Contribution to Nation Building
Dr. A. S. Arbole, Kowad ||227



http://www.printingarea.blogspot.com/03 www.vidyawarta.com/03

52

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन

डॉ. डी. जी. चिघळीकर
सहा. प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज

**********

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन त्यांनी वेळोवेळी घेतलेली भूमिका, केलेली भाषणे, लिहिलेली पुस्तके, दिलेली निवेदने आणि शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून केलेल्या कार्यातून दिसून येतो. शिक्षणाची व्याख्या करताना बाबासाहेब म्हणतात कि, व्यक्तीला जाणीव (Realization) करून देते ते शिक्षण होय. शिक्षणाच्या अभावामुळे माणसाला स्वत:च्या क्षमतांचा व बलस्थानांचा विसर पडतो. तो गुलामगिरीचे जीवन जगायला लागतो. यासंदर्भात बाबासाहेब म्हणतात कि उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस बलहीन होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो. बाबासाहेबांना अपेक्षा होती कि शिक्षणामुळे माणूस गुलामगिरी झुगारून देईल. म्हणून ते नेहमी शिक्षणाचा आग्रह धरतात. कारण भारतीय शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी फार विचित्र आहे. वैदिकांनी शुद्र, अतिशूद्र आणि महिलांना शिक्षणाचा अधिकार नाकारलेला आहे. ज्ञानार्जन करणाऱ्या शंभूकाचा वध तर एकलव्याचा अंगठा कापून घेतल्याचे उदाहरण आपल्या समोर आहे. सर्वप्रथम बुद्ध काळातच बहुजन समाजाच्या शिक्षणाची सुरुवात झालेली आहे. 'ज्ञान म्हणजे प्रकाश' अशी ज्ञानाची व्याख्या करून समस्त मानवजातीला स्वयंप्रकाशित होण्याचा होण्याचा संदेश बुद्धाने दिलेला आहे. सम्राट अशोकाने अनेक विद्यापीठांची निर्मिती करून खऱ्या अर्थाने शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची सुरुवात केली आहे. पुष्यमित्र शुंगाने सम्राट अशोकाचा नातू ब्रहद्रथाची हत्या करून मनुस्मृती च्या माध्यमातून शुद्र, अतिशूद्र आणि महिलांच्या शिक्षणाला बंदी घातली. शिक्षणाची दारे उघडण्यासाठी ब्रिटीश राजवटीची वाट पहावी लागली तर महात्मा जोतीराव फुले, सावित्रीमाई फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या सामाजीकरणाची सुरुवात केली. परंतु १९९१ मधील नवीन आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणून शिक्षणाचे खाजगीकरण व बाजारीकरणाची सुरुवात होवून ती वादग्रस्त व संदिग्ध अशा 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' पर्यंत पोहोचलेली आहे. अशा प्रकारच्या शैक्षणिक वातावरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक दृष्टीकोन समजून घेणे महत्वाचे आहे.

**शोधनिबंधाचे उद्दिष्ट :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन समजून घेवून जास्तीत जास्त लोकांच्यापर्यंत पोहोचवणे.

**शोधनिबंधाचे गृहीतक :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन अत्यंत व्यापक व सर्वसमावेशक स्वरूपाचा आहे.

**संशोधन पद्धती :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन हा शोधनिबंध माहितीच्या दुय्याम साधन सामुग्रीवर आधारित आहे. संशोधनासाठी संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, साप्ताहिके आणि वर्तमानपत्रातील लिखाणाचा आधार घेतला गेला आहे.आशय विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करून मांडणी करण्यात आलेली आहे.

**दर्जेदार व स्वस्त शिक्षणाचा आग्रह :**

प्राथमिक शिक्षण हाच खरा शिक्षणाचा पाया आहे तो पक्का असला पाहिजे. बाबासाहेब म्हणतात की केवळ बाराखड्या शिकवणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर मुलांची मने सुसंस्कृत करणारे दर्जेदार शिक्षणही शाळांनी दिले पाहिजे. तसेच बाबासाहेबांचा नेहमीच स्वस्त शिक्षणाचा आग्रह असायचा यावद्दल ते म्हणतात की शिक्षण हे असे कांही आहे की, जे प्रत्येकाच्या

आवाक्यात आणता आले पाहिजे म्हणून शिक्षण विभागाचे धोरण निम्नस्तरीय वर्गासाठी शिक्षण जितके स्वस्त करता येईल तितके करण्याचे असले पाहिजे. आज मात्र शिक्षणाच्या खाजगीकरणाचा परिणाम म्हणून शिक्षण महाग झालेले असून दर्जाचा विषय सुद्धा चिंतनाचा ठरत आहे.

**विद्यापीठ प्रतिनिधी सभेत मागासवर्गीयांना स्थान:**

विद्यापीठातील अधिकार मंडळे जसे की सिनेट, व्यवस्थापन परिषद, विविध अभ्यासमंडळे इत्यादी मध्ये मागासवर्गीय प्रतिनिधी असले पाहिजेत. यासंदर्भात बाबासाहेब म्हणतात की, विद्यापीठाच्या प्रतिनिधी सभेत मागासवर्गीय सदस्यांना स्थान मिळाले पाहिजे. प्रतिनिधी सभा ही कायदे बनविणारी संस्था आहे. व सर्व वर्गाच्या प्रतिनिधींना त्यात स्थान मिळून प्रत्येक वर्गाच्या समस्येवर तोडगा काढला गेला पाहिजे. यासंदर्भात अधिक सविस्तर बोलताना बाबासाहेब म्हणतात की, समाजातील बहुसंख्य घटक मागे राहिला याचा अर्थ उच्चवर्गातील लोकांनी या मागासवर्गाप्रती चांगुलपणा दाखविलेला नाही. तेंव्हा शैक्षणिक विषयातील तज्ञ मंडळी जी मोठ्याप्रमाणात उच्चवर्णीय आहेत, ती मागासवर्गीयांच्या समस्या सोडवतील यावर माझा विश्वास नाही.म्हणून मागासवर्गीयांना उच्च वर्णीयांच्या दयेच्या भरवशावर न सोडता, त्यांना प्रतिनिधी सभेत स्थान मिळाले पाहिजे. बाबासाहेबांची ही भूमिका आजच्या काळातही महत्वाची ठरते, कारण विद्यापीठ प्रतिनिधी मंडळात लॉबिंग हा प्रकार कायमच चर्चेचा विषय ठरलेला आहे.

**सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हाच एकमेव उपाय :**

औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयाच्या शिलान्यास प्रसंगी बोलताना बाबासाहेब म्हणतात की, हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे महत्व किती आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते पण हे चूक आहे. कारण हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणे त्यांना उच्च वर्गाची सेवा करण्यास भाग पाडणे नव्हे. खालच्या वर्गाची प्रगती मारून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागत असल्यामुळे त्यांच्यात होणारा न्यूनगंड नाहीसा करणे, हे खरे शिक्षणाचे ध्येय आहे. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हेच एकमेव औषध आहे. या वरून बाबासाहेब शिक्षणाबद्दल किती व्यापक दृस्तीकोनातून बघतात ही गोष्ट लक्षात येते.

**समाजाच्या प्रगतीसाठी महिलांच्या शिक्षणाला प्राधान्य :**

कोलंबिया विद्यापीठात शिक्षण घेत असताना बाबासाहेबांनी आपल्या वडिलांचे स्नेही सुभेदार शिवनाक जमेदार यांना ४ ऑगस्ट १६१३ रोजी एक पत्र पाठवले होते. त्या पत्रामधून बाबासाहेबांचा महिलांच्या शिक्षणाचा प्राधान्यक्रम लक्षात येतो. बाबासाहेब त्या पत्रामध्ये असे म्हणतात की, आई—बाप आपल्या मुलांना जन्म देतात, कर्म देत नाहीत, असे त्यांचे म्हणणे ठीक नाही. आई—बाप मुलांच्या आयुष्यात वळण लावू शकतात. ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्याही शिक्षणासाठी धडपड केली, तर आपल्या समाजाची प्रगती झपाट्याने होईल. बाबासाहेब असेही म्हणतात की एखाद्या समाजाच्या अर्थातच राष्ट्राच्या प्रगतीचे मोजमाप हे त्या समाजातील महिलांच्या प्रगतीवरून ठरवले पाहिजे. महिला प्रगत तर समाज अर्थात राष्ट्र प्रगत होईल.

**विज्ञान व तंत्र शिक्षणावर भर :**

बाबासाहेब पारंपारिक शिक्षणाबरोबरच विज्ञान आणि तंत्र शिक्षणाचाही आग्रह धरतात. या संदर्भात आपली भूमिका मांडताना म्हणतात की, हिंदुस्थानात विद्यापीठात किंवा तत्सम विज्ञान आणि तंत्रशिक्षण संस्थात अनुसूचित जातीतील विद्यार्थी विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेतील उच्चशिक्षण घेत असतील तर, त्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती रूपाने हिंदुस्थान सरकारने वार्षिक अनुदान द्यावे. याबरोबरच बाबासाहेब पुढे बोलताना असे म्हणतात की, इंग्लंड, राष्ट्रकुल राष्ट्र, युरोप आणि अमेरिका येथील विद्यापीठातून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान शास्त्रातील उच्च शिक्षणासाठी हिंदुस्थान सरकारने अनुदान द्यावे. आजच्या काळातील विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती लक्षात घेतली तर बाबासाहेब आंबेडकर यांची दूरदृष्टी दिसून

येते.

**ज्ञानाचा उपयोग समाजासाठी :**

शिकलेल्या माणसाकडून अपेक्षा व्यक्त करताना बाबासाहेब म्हणतात की, शिकलेली माणसे नुसती पोटभरू असून चालणार नाही. ज्यांना स्वार्थाच्या पलीकडे कांहीही दिसत नाही, ज्यांना थोडाही परार्थ करता येत नाही, ती माणसे नुसती शिकली म्हणून काय झाले ? शिकलेल्या माणसाने आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करावा. विजेचा गोळा कळ दाबताच जसा निमिषार्धात अंधार नष्ट करून स्वतःचे प्रकाशमान साम्राज्य निर्माण करतो, त्याच प्रमाणे शिक्षण संपादन केलेल्या प्रतेक माणसाने समाजातील अज्ञान दूर करण्यासाठी उपयुक्त ठरले पाहिजे. यासंदर्भात पुढे बाबासाहेब म्हणतात की, रेल्वेचे इंजिन जसे प्रथम एक—एक डबा एकमेकाला जोडून रेल्वेची गाडी तयार करते व नंतर ती गाडी स्वतःच वाहून नेते, तसे समाजाला घडविण्याचे व वाढविण्याचे क्रांतिकारी कार्य शिकलेल्या माणसाने केले पाहिजे. आजच्या स्वार्थप्रेरित समाजात बाबासाहेबांचा हा विचार अत्यंत महत्वाचा ठरतो.

**प्राध्यापक कसा असावा :**

प्राध्यापक अर्थातच शिक्षक कसा असावा या संदर्भातील बाबासाहेबांची मते अत्यंत स्पष्ट आणि मार्मिक स्वरुपाची आहेत. बाबासाहेब स्वतः सन १९२३ ते १९३७ या काळात मुंबई येथील सीडेनहॅम कॉलेजमध्ये राजकीय अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. तसेच ते कांही काळ लॉ कोलेजमध्ये प्राचार्य सुद्धा होते. बाबासाहेब म्हणतात की, प्रोफेसर नुसता विद्वान असून चालायचे नाही तो सर्वश्रुत असला पाहिजे. त्याची वाणी शुद्ध असली पाहिजे. तो स्वतः अत्यंत उत्साही असला पाहिजे व आपला विषय मनोरंजक करू अशी त्याच्यात धमक असली पाहिजे, तरच विद्यार्थी सुद्धा अत्यंत उत्साही होतील यात शंका नाही. यासंदर्भातच बाबासाहेब पुढे म्हणतात की, प्रोफेसरांनी अध्ययनाच्या आणि अध्यापनाच्या कामी स्वतःला इतके वाहून घ्यावे की, आपल्या घराकडे बघायला मुळीच सवड मिळता कामा नये, हे कार्य संपूर्णपणे त्यांच्या पत्नीवरच सोपविण्यात आले पाहिजे. प्रोफेसर लोकांनी भलती कामे अंगावर घेवून आपल्या जबाबदाऱ्यांचे क्षेत्र उगाच वाढवीत जावे ही गोष्ट मान्य नाही. अध्यापन व अध्ययन यामध्ये संशोधनही आलेच या तीन गोष्टी खेरीज प्रोफेसरांनी दुसरे कोणतेही काम करता कामा नये.

पुढे जावून बाबासाहेब म्हणतात की, मला वाटते की, थोडेसे रुपये मिळावावेत व आपली सुखाने कालक्रमणा करावी या पलीकडे आमच्या प्रोफेसरांना आयुष्यात कांही महत्वाकांक्षाच नाही.या महत्त्वाकांक्षेच्या अभावाने त्यांच्या हातून कांहीतरी भरीव कार्ये होत नसावे. ते मधून—मधून कांही पाठ्यपुस्तकावर टिपणे लिहितात. टिपणे लिहिण्याच्या पलीकडे कांही महत्वाचे कार्य आहे, याची माहिति त्यांना आहे की नाही कोण जाणे. विशेषतः हिंदी प्राध्यापकांनी चांगल्या दर्जाचे संशोधन केले पाहिजे, प्राध्यापकांनी एका विशिष्ट विषयामधेच सखोल अभ्यास करावा अशी बाबासाहेबांची भूमिका होती.

बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या पीपल्स एजुकेशन सोसायटी च्या महाविद्यालयामध्ये प्राध्यापक नेमण्यासंदर्भात बाबासाहेबांची अशी भूमिका असे कीपीपल्स एजुकेशन सोसायटी ही अयोग्य माणसांना प्राध्यापक म्हणून नेमणारी उकीरड्याची जमीन नव्हती. प्राध्यापकाकडे व्यक्तिमत्व असले पाहिजे, त्याने आपल्या विषयाची यथासांग तयारी केली पाहिजे, विद्यार्थ्यांना अधिकाधिक वाचन करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

**विद्यार्थी कसा असावा :**

विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये जशी आई—वडिलांची भूमिका महत्वाची असते. तसेच शिक्षणामध्ये गुरूंचे स्थानही अत्यंत महत्वाचे असते. बाबासाहेब म्हणतात की, माझे तीन फक्कड गुरु आहेत. माझ्या जीवनात त्यांनी क्रांती घडवून आणली. माझ्या उन्नतीला ते कारणीभूत झाले. यापैकी माझे पहिले सर्वश्रेष्ठ गुरु गौतम बुद्ध, माझे दुसरे गुरु संत कबीर तर माझे तिसरे गुरु महात्मा जोतीराव फुले आहेत. तसेच माझे तीन उपास्य दैवते आहेत. पहिले उपास्य दैवत आहे 'विद्या' दुसरे उपास्य दैवत 'विनयशीलता' विनय म्हणजे लीनता, लाचारी नव्हे. माणसाने स्वाभिमानाने जगले पाहिजे. 'शिलसंवर्धन' हे माझे तिसरे उपास्य दैवत आहे. यातून बाबासाहेब विध्यार्थ्यांना असा संदेश देतात की,

विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात कोणाला तरी गुरु मानले पाहिजे आणि त्यांनी सांगितलेल्या मार्गावरून मार्गक्रमण केले पाहिजे.

विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत राजकारणापेक्षा अभ्यासाला प्राधान्य दिले पाहिजे. विद्यार्थ्यांना ज्ञानाची आंच असली पाहिजे. यासंदर्भात बाबासाहेब आंबेडकर अमेरिकेत असतानाचा एक प्रसंग असा आहे की, लाला लजपतराय यांनी बाबासाहेबांना राजकारणात ओढण्याचा प्रयत्न केला. बाबासाहेबांनी तो मोह मोठ्या विवेकपूर्ण संयमाने टाळला आणि लाला लजपतराय यांना सांगितले की, इतर सर्व गोष्टींचा विचार बाजूला ठेवला तरी बडोदा नरेशांनी मला अतिशय साहाय्य केले आहे. त्यांना दिलेले वचन न मोडता आपला अभ्यास पूर्ण करणं माझं पहिल कर्तव्य आहे. विद्यार्थ्यासमोर आदर्श असले पाहिजेत म्हणून बाबासाहेब सांगतात की, आपल्या देशात रानडे, गोखले, टिळक, सर फिरोजशहा मेहता व त्यांच्यासारखे कितीतरी आस्थेवाईक विद्यार्थी निर्माण झाले. त्यांच्यामध्ये एक उर्मी, शिस्त होती. जबाबदारीची जाणीव होती. पण अशी जाणीव आजच्या विद्यार्थ्यांत नाही. शिक्षण हाच जीवनाच्या प्रगतीचा मार्ग आहे हे जाणून विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करावा आणि समाजाचे विश्वासू नेते बनावे. अशी खंत व्यक्त करून आशावादही बाळगतात.

**शिष्यवृत्ती आणि वसतीगृह :**

आपणास माहीतच आहे की, बाबासाहेबांना बडोदा नरेश महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आपल्या राज्यामध्ये नोकरी करण्याचा करार करून हाह्र रुपये शिष्यवृत्ती दिली होती. बाबासाहेबांना याची जाणीव होती म्हणून त्यांनी आपल्या हयातीमधेच मागासवर्गीयांना देश—विदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्तीची तरतूद करून घेतली होती. यासंदर्भात बाबासाहेब म्हणतात की, मागासवर्गीय विध्यार्थ्यांचे पालक इतके गरीब असतात की, स्कॉलरशीप ही विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला केलेली मदत आहे, कुटुंबाला दिलेली देणगी नव्हे हे विसरून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीचा ते दुरुपयोग करतात. म्हणून या पैशातून सरकारी किंवा खासगी वसतिगृहे चालविणे विद्यार्थी हिताचे होईल. बाबासाहेबांनी स्वातंर्त्यपूर्व काळातील हिंदुस्थान सरकारकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ३ लाख रुपयांचा निधी मिळवून शिष्यवृत्तीची सोय केली होती. परंतु मागासवर्गीय विध्यार्थ्यांचे नापास होण्याचे प्रमाण जास्त होते. यासंदर्भात नाराजी व्यक्त करताना बाबासाहेब म्हणतात की, मी लहानशा खोलीत रहात होतो. या खोलीत माझे कुटुंब, बहिणीची दोन मुले, एक बकरी, जाते पाटा होता. मिणमिणत्या दिव्याखाली मी अभ्यास करीत होतो. आता विद्यार्थ्यांना चांगली वसतिगृहे असताना त्यांनी अभ्यास का करू नये.

**पालकांची भूमिका :**

पालकांकडून अपेक्षा व्यक्त करताना बाबासाहेब म्हणतात की, पालकांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाची काळजी घेतली पाहिजे. बाबासाहेबांचे वडील रामजी सकपाळ यांनी आपल्या मुलांकडून लहानपणीच अनेक धर्मग्रंथांचे वाचन करून घेतले.इंग्रजी शिक्षणाचा आग्रह धरला. बाबासाहेब स्वत: सांगतात की, मी इंग्रजी चांगले बोलतो व लिहितो अशी थोडीबहुत ख्याती आहे असे मला वाटते. पण योग्य शब्दांचा तोल तोलून उपयोग कसा करावा हे माझ्या वडिलांनी जसे शिकवले तसे कोणाही मास्तरांनी मला शिकवले नाही. तर्खडकरांच्या पुस्तकातून उलटसुलट शब्द विचारून ते माझ्या ज्ञानाची नेहमी चाचणी घेत. त्याचप्रमाणे इंग्रजी वाक्यप्रचार व योग्य भाषाशैली कशी वापरावी हेही त्यांनीच मला शिकवले. नवनवीन पुस्तके आणून देण्यासाठी बाबासाहेब जेंव्हा आपल्या वडिलांकडे हट्ट धरीत असत तेंव्हा मागितलेले पुस्तक संध्याकाळपर्यंत आणून देत असत. अनेकवेळा बाबासाहेबांच्या वडिलांकडे पैसे नसत, त्यावेळी ते आपल्या मोठ्या मुलीकडून सोन्याचा दागिना मागून घेत असत आणि तो गहाण ठेवून पुस्तके आणून देत असत. बाबासाहेबांना पहाटे अभ्यासाला उठवत असत, आणि स्वत:ही वाचन करीत बसत. केवळ आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी सातारा सोडून मुंबई गाठली होती.

**ग्रंथावरील प्रेम :**

बाबासाहेबांचे पुस्तकावर प्रचंड प्रेम होते. केवळ पुस्तकासाठीच मुंबईच्या दादर येथील हिंदू कॉलनी

मध्ये 'राजगृह' नावाचेघर बांधले होते. पुस्तकाबद्दल प्रेम व्यक्त करताना बाबासाहेब म्हणतात की, माझ्या पुस्तकाला बेलीफाने हात लावला तर त्याला गोळी घालीन. यासंदर्भातच बाबासाहेब पुढे असेही सांगतात की,मी प्रवास करीत असताना माझ्याजवळ नेहमीच चार पुस्तके व वर्तमानपतत्रे असतात. परंतु प्रवासात मला जी शिकलेली माणसे दिसतात त्यांच्या हातात पुस्तके वर्तमानपत्रे यांच्या ऐवजी सिगारेटच्या पेट्या दिसून येतात.

**शिक्षण संस्था :**

बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजन समाजाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षण संस्था काढल्या. त्यामध्ये सन १९२४ मध्ये बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. 'शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा' हे बहिष्कृत हितकारिणी सभेचे ब्रीदवाक्य होते. तर या सभेच्या ध्येय व उद्दिष्टांमध्ये १) वसतिगृहे उघडवून दलित वर्गामध्ये शिक्षणाच्या प्रसाराचे प्रचालन करणे किंवा त्यासाठी अशाच प्रकारची आवश्यक किंवा इष्ट वाटणारी साधने उपयोगात आणणे. २) वाचनालये, समाजकेंद्रे आणि वर्ग किंवा अभ्यासमंडळ उघडून दलित वर्गामध्ये संस्कृतीच्या प्रसाराचे प्रचालन करणे. ३) औद्योगिक आणि कृषीशाळा सुरु करून दलित वर्गाच्या आर्थिक स्थितीमध्ये प्रगती आणि सुधारणा करणे.

सन १९२८ मध्ये बाबासाहेबांनी दलित वर्ग शिक्षण संस्थेची (Depressed Classes Education Society) स्थापना केली. संस्थेच्या वतीने एकून पाच वसतीगृह चालवली जात होती.

जुलै १९४५ मध्ये बाबासाहेबांनी पीपल्स एज्यूकेशन सोसायटी ची स्थापना केली. संस्थेच्या घटनेनुसार बाबासाहेबांच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती संस्थेची संचालक होऊ शकतनाही. संस्थेच्या वतीने १९४६ मध्ये मुंबई येथे शिद्धार्थ महाविद्यालय तर १९५० मध्ये औरंगावाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली.

संसदीय लोकशाही बळकट करण्यासाठी बाबासाहेबांनी ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रंस टू पॉलिटीक्स या नावाची संसदीय शिक्षण देणारी संस्था जुलै १९५६ मध्ये मुंबई येथे सुरु केली. त्यात राजकारण, अर्थशास्त्र, अंदाजपत्रक, कामगार संघटना, संसदीय कामकाज विषयक नियम आणि परंपरा इत्यादी आवश्यक विषयाबरोबरच वक्तृत्व साधनेला प्राधान्य दिले होते.

**सायमन कमिशनला निवेदन :**

भारतात आलेल्या सायमन कमिशनला बाबासाहेबांनी आपल्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या वतीने दिनांक २९ मे १९२८ रोजी अस्पृश्यांच्या शिक्षणासंदर्भात निवेदन दिले होते. विषय असा होता की १९२३ मध्ये मुंबई इलाख्यात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा करण्यात आला होता. बाबासाहेबांच्या मतानुसार घऊ व्या कलमानुसार शिक्षणाचा विषय जो प्रांतिक सरकारच्या कक्षेत होता व प्रांतिक सरकारच्या महसुलामधून शिक्षण खात्याचा खर्च होत असे, तो विषय प्रांतिक सरकारकडून काढून घेवून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, (लोकल बोर्डाच्या) कक्षेत टाकण्यात आला, हा बदल वाईट स्वरूपाचा होता. म्हणून बाबासाहेबांनी आपल्या निवेदनात कांही महत्वाच्या सूचना केल्या होत्या. १) शिक्षण खाते लोकल बोर्डाकडे देण्याचे त्वरित थांबवावे व सदर खाते मुंबई सरकारनेच चालवावे. २) प्राथमिक शिक्षण सक्तीचे असले पाहिजे ते ऐच्छीक ठेवता कामा नये. ३) जे नियम मुसलमानांच्या शिक्षणासाठी करण्यात आले आहेत तेच नियम अस्पृश्यांच्या शिक्षणाबाबत लागू करण्यात यावेत. (हंटर कमिशन ने मुस्लिमांच्या शिक्षणासाठी एकून घक्त सूचना केल्या होत्या त्यामुळे मुस्लिमांच्या शिक्षणाची स्थिती पुढारलेल्या हिंदू नंतर दुसऱ्या क्रमांकाची होती) ४) अस्पृश्य समाजाच्या शिकलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास सरकारी नोकरीची खात्री देण्यात यावी तरच त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळू शकेल.

**घटनात्मक तरतुदी :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे घटना मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यामुळे संविधानिक तरतुदी करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. भारतीय शिक्षणासंदर्भात कांही घटनात्मक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

अनुच्छेद २८.१ – पूर्णतः राज्याच्या पैशातून चालवल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत

कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही.

अनुच्छेद २८,२– राज्याकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्य निधीतून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

अनुच्छेद ३०,१ – धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.

अनुच्छेद ३०,२ – शैक्षणिक संस्थांना सहाय्य देताना राज्य एखादी शैक्षणिक संस्था ही, धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या एखाद्या वर्गाच्या व्यवस्थापनाखाली आहे, या कारणावरून तीला प्रतिकूल होईल, अशा प्रकारे भेदभाव करणार नाही.

अनुच्छेद ४१ – राज्य हे आपली आर्थिक क्षमता व विकास यांच्या मर्यादेत कामाचा, शिक्षणाचा हक्क आणि बेकारी, वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पीडीत आणि कांहीही अपराध नसताना हलाखीचे जिणे ज्यांच्या वाट्याला आले आहे. अशा अन्य व्यक्तींच्या बाबतीत लोकसहाय्याचा हक्क उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतुद करतील.

अनुच्छेद ४५ – राज्य या संविधानाच्या प्रारंभापासून दहा वर्षाच्या आत सर्व बालकांना त्यांच्या वयास चौदा वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

अनुच्छेद ४६–राज्य जनतेतील दुर्बल घटक आणि विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन विशेष काळजीपूर्वक करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे रक्षण करील.

अनुच्छेद ३३७ – आंग्लभारतीय समाजाच्या लाभाकरिता शैक्षणिक अनुदानाबाबत विशेष तरतूद.

अनुच्छेद ३५० क– प्रत्येक राज्य आणि राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकारी भाषिक अल्पसंख्याक समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर मातृभाषेतूनशिक्षण देण्याच्या पर्याप्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहील, आणि अशा सोयी पुरवणे शक्य व्हावे, यासाठी राष्ट्रपती स्वत:ला आवश्यक किंवा योग्य वाटतील असे निर्देश कोणत्याही राज्याला देवू शकेल.

अनुच्छेद ३७१ ड–संसदेला आंध्रप्रदेश राज्यात केंद्रीय विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी कायद्याद्वारे तरतूद करता येईल.

भारतीय संविधानात झालेल्या या कांही तरतुदी लक्षात घेतल्या तर बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षण विषयक दृष्टीकोनाची व्याप्ती लक्षात येईल.

**लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी शिक्षण :**

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असून ती टिकली पाहिजे म्हणून बाबासाहेब म्हणतात की, लोकशाही यशस्वी करायची असेल तर समाज नैतिक मूल्याधिष्ठित शिक्षणाद्वारे संस्कारीत असावा. लोकशाहीसाठी सुशिक्षित समाजाची अत्यंत गरज आहे. शिक्षित–नैतिक मूल्याधिष्ठित समाजाची लोकशाही ही सर्वाधिक यशस्वी किंवा हमखास यशस्वी ठरू शकेल.

**शिक्षणाला शीलाची जोड :**

बाबासाहेब आंबेडकर आपल्या व्यक्तिगत जीवनात 'शील' अर्थात सदाचारयुक्त आचरणाला सर्वाधिक महत्व देतात. मानवी जीवनतील शीलाचे महत्व व्यक्त करताना बाबासाहेब म्हणतात कि, आपण शिकलो म्हणजे सर्वकांही झाले असे नाही मात्र शिक्षणाबरोबरच माणसाचे शील ही सुधारले पाहिजे. शीलाशिवाय शिक्षणाची किंमत शून्य आहे. ज्ञान हे तलवारीसारखे आहे. समजा एखाद्या माणसाच्या हाती तलवार आहे. तिचा सदुपयोग की दुरुपयोग करावयचा हे त्या माणसाच्या शीलावर अवलंबून राहील. तो त्या तलवारीने एखाद्याचा खूनही करील किंवा एखाद्याचा बचावही करील ज्ञानाचे तसेच आहे. आज शिक्षणाचे प्रमाण तर वाढलेले आहे पण शील अर्थात सदाचारयुक्त आचरणाच्या बाबतीत मात्र संदेह निर्माण झालेला आहे.

**निष्कर्ष :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेळोवेळी मांडलेले विचार, केलेले लिखाण आणि घेतलेली भूमिका लक्षात घेता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन अत्यंत व्यापक व सर्वसमावेशक

स्वरूपाचा आहे. आजच्या काळातील बदलती शिक्षण पद्धती लक्षात घेता बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षण विषयक दृष्टीकोनाची अत्यंत गरज आहे.

**संदर्भ :**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, प्रकाशक सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पुनर्मुद्रण ऑक्टोबर १९९९

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानस आणि तत्त्वविचार, धनंजय कीर

३) भारतीय संविधान, मराठी आवृत्ती

⌘⌘⌘